# <u>आत्मभान</u>

कोण मी? कशी मी?
मुलगी, बहीण, आत्या, मावशी
प्रेयसी, सखी, पत्नी, स्नुषा
काकी, मामी, आई, खूप काही
घरातली ही सारी नाती
सहजपणे चिकटलेली.....
मैत्रिण, सहकारी, उच्चपदस्थ
जबाबदार अधिकारी व्यक्ति
घराबाहेरील सारी नाती
बिरुदासारखी मिरवणारी....
आठवतयं चांगलं मला,
मी शाळेत होते तेव्हाचं...
सगळ्यातच, मी पहिलं यावं
ही माझ्याकडून अपेक्षा
माझ्याच पालकांची.....
आणि लग्न झाल्यानंतर
चांगली बायको, सुग्रण गृहिणी
आपल्या मुलांची आदर्श आई
ही माझ्याकडून अपेक्षा
माझ्याच नवऱ्याची.....
चार भिंतींबाहेरच्या जगात
लोकांना दिसणारी मी
धडाडीची, कर्तृत्ववान, सुंदर
अधिकाधिक अपेक्षा
माझ्याच निकटवर्तीयांची...
पण कुणीच विचारलं नाही
‘मला’ नक्की काय हवयं,
कुणालाच कळलं नाही
मी कोण? मी कशी?
कळलयं सारं मला,
घरातली चिकटलेली नाती

अन् घराबाहेरच्या उपाध्या
साऱ्याला व्यापून उरलेली
पसरलेल्या क्षितिजासारखी
पण अस्तित्वालाही पारखी
मी एक स्त्री, नारी, महिला
अबला नव्हे, मी सबला
हाडामांसाची जिवंत व्यक्ती!
सारी नाती आणि उपाध्या
लपेटलेली मी स्त्री....
साऱ्या भवतालातून
'मान्यता'हवी असणारी
स्वत्व सिद्ध करणारी
'आत्मभान' जपणारी
मी- एक स्त्री! मी- एक स्त्री!

लीना माटे
leenashining@gmail.com

( पूर्वप्रसिध्दी - **महाराष्ट्र टाईम्स - जागतिक महिला दिन ८ मार्च २०१५** )